# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 04/11/2023

| अ.क्र. | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता.वेळ | दाखल.ता.वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | धारणी 659/23 कलम 324,504, 506, भा.द.वि. | इरफान खान इमाम खान वय 44 वर्ष रा. वार्ड क्र. 12 मांडवा धारणी | मो. अजहर मो. अफजल रा. मांडवा रोड धारणी | भारत पेट्रोल पंप धारणी 1km दक्षिण | 05/11/2023 चे 08/00 वा. | 05/11/2023 चे 11/30 वा. | हकीकत, अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी व आरोपी एकाच गावाचे राहणारे असून दोघेही फळ विक्री चा व्यवसाय करतात गेल्या 5 महिन्या पूर्वी यातील फिर्यादी याने 7000/- रुपये उसनेवारीने घेतले होते तयापैकी 1000/- रुपये परत केले आज घ. ता.वेळी आरोपी याने पण पैशे मागितले असता फिर्यादी याने दिवाळी चे आधी पैसें देतो असे म्हटले असता नमूद आरोपी याने जमिनीवरचे दगड उचलून फिर्यादी याचे डोक्याला डावे बाजूला मारून जखमी केले अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट व मेडिकल सर्टि वरून सदरचा घुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 2 | परतवाडा 962 /2023 कलम 302,34 भा.द.वि. | गजानन महादेवराव येवले वय 55 वर्ष रा. देवगाव | 1. दिलीप वय 50 वर्ष पूर्ण नाव माहित नाही 2. दिलीप याची पत्नी दोन्ही रा. केशरपूर | देवगाव 10 किमी दक्षीण | 04/11/2023 चे रात्री 11/00 वा. चे पुर्वी | 05/11/2023 चे 04/34 वा. | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद फिर्यादी याचे शेतात यातील आरोपी क 1 व 2 हे दि. 29/10/2023 पासून हफ्त्याने मजुरी कामाला त्याचे शेतात होते. तसेच यातील मृतक राजु नारायण येवले वय 50 वर्ष हे फिर्यादीचे लहान भाऊ यांचे कडे मजुरीचे कामाला शेतात होते. दि 04/11/2023 चे रात्री 09/00 वा. दरम्यान फिर्यादीचे लहान भाउ हयांना यातील आरोपी क 1 व 2 हे त्यांचे सामानासह दिसले व देवगाव स्टॉप वर ऑटोने कुठेतरी जायला वाट पाहत होते. तेव्हा फिर्यादीला त्याचे भावाने आरोपी कुठेतरी जाण्यास निघाले असे सांगीतले वरून फिर्यादीने बापुराव शनवारे यास त्यांना पाहण्याकरिता स्टॉपवर पाठवीले असता ते कुठेही दिसले नाही. त्याला शेतातील खोलीचे दार व गोठयाचे गेट उघडे दिसले त्याने आजुबाजुला पाहीले तर गोठयाचे मागे मृतक राजु नारायण येवले वय 50 वर्ष रा. देवगाव हे जख्मी व रक्त बंबाळ अवस्थेत दिसले. वरून बापुराव शनवारे याने घरी येवून फिर्यादीस सांगीतले वरून फिर्यादी पाहण्यास गेले असता मृतक हे जख्मी अवस्थेत गवतामध्ये पडलेले दिसले. त्यांनी तेथे राहणारी उशाबाई गोवींद भुरांदे हिला विचारले असता तिने सांगीतले मृतक व आरोपी क्र 1 यांचे एकमेकाशी भांडण सुरू होते व ते दोघेही गोठयामागे निघुन गेले असे सांगीतले. फिर्यादी ने पोलीसांना फोन केला पोलीस आल्यावर पोलीसांनी मृतकाला उप जिल्हा रुग्नालय अचलपुर नेले तेथे डॉक्टरानी मृतक हे मयत असल्याचे सांगीतले. घटनास्थळी मृतकाचे डोक्याला जबर दुखापत झाल्याचे व घटनास्थळी मोठा दगड रक्त डागाचा मिळुन आल्याने आरोपी क 1 व 2 यांनी मृतकला दगडाने डोक्यावर मारून जिवानिशी ठार करून पळुन गेले. वरून फिर्यादीच्या जबानी रिर्पोट करून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | चांदुर रेल्वे 529/2023 कलम 279,337, 338 भा.द.वि. | सौ संगीता अनिल चव्हाण वय 30 वर्ष धंदा घरकाम रा.वडाळी अमरावती | चार चाकी गाडी MH -28 BK-5204 चा चालक | ग्राम मांजर खेड पेट्रोल पंप जवळ पश्चिम 5 के एम | 01/11/2023 चे 16/00 वा. ते 16/45 वा. दरम्यान | 05/11/2023 चे 15/37 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकाणी चार चाकी गाडी MH-28 BK-5204 चा चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधावं वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी यांच्या पतीस नामे अनिल चव्हाण गंभीर जखमी करण्यास कारणीभूत ठरला आहे असे फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 4 | दर्यापूर 602/2023 कलम 307,504 भा.द.वि. | मुस्कान परवीन सय्यद जावेद रा.टाटानगर बाभळी दर्यापूर तर्फे PSI अनुराधा पाटेखेडे पो.स्टे. दर्यापूर | सय्यद जावेद सय्यद युनूस वय 28 वर्ष रा. टाटा नगर बाभळी दर्यापूर | फिर्यादीचे राहते घरी टाटा नगर बाभळी दर्यापूर 3 किमी उत्तर | 05/11/23 चे 10/30 वा. | 05/11/23 चे 13/20 वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की फिर्यादी व तिचे पती हे सोबत राहत असून फिर्यादीची सासू-सासरे वेगळे राहतात त्या कारणावरून फिर्यादीचा पती (आरोपी) हा नेहमी फिर्यादी सोबत नेहमी वाद करून भांडण करतो नमूद घता वेळी व ठिकाणी फिर्यादीने तिच्या पतीला घराच्या समोरील दरवाज्याला पृष्ठ लावण्यास सांगितले असता आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून घरातील लाकडी पलंगावर पाडून पावशीने फिर्यादीच्या गळ्यावर वार केला परत दुसऱ्यांदा गळयावर वार करत असता फिर्यादीने तिचे उजव्या हाताने पावशी पकडून ठेवले तर आरोपीने बाजूने असलेल्या चाकू उचलून फिर्यादीचे डाव्या बगल मध्ये वार करून जीवाने मारण्याचा प्रयत्न केला अशा फिर्यादीच्या बयाना वरून व मेडीसर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता